# प्रेसनोट

## पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 292/2022 दिनांक : 31.07.2022

## 1)दरोडयाची तयारी :-

**किनवट :-**दिनांक 29.07.2022 रोजी 23.05 वा. चे सुमारास, **इदगाह मैदानाचे बाजुस एरिगेशन कॉलनीच्या बाजुस ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्यांच्या सोबतचे कर्मचारी हे दरोडा पेट्रोलींग करीत असताना त्यांना गोकुंदा येथे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की यातील नमुद सहा आरोपी हे एखादा दरोडा टाकण्यासाठी शस्त्रासह टाटा सुमो जीपमध्ये फिरत आहेत. सदर माहिती वरुन त्याचेंवर छापा मारुन त्यांना पकडुन त्यांची जीपमध्ये झडती घेता त्यांच्याजवळ धारदार तलवारी, मिरची पावडर, रॉड, दोरी असे दरोडा टाकण्यासाठी चे साहित्य व वाहनासह दरोडा घालण्याचे तयारीत असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/सय्यद चॉद पाशा नुरशहा, ने. पोस्टे किनवट** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 151/2022 कलम 399 भादवि सह कलम 4/25 शस्त्र अधिनियम 1959 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री पवार, मो. नं. 9850562665** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरीचा प्रयत्न :-

**हदगाव :-**दिनांक 30.07.2022 रोजी 11.30 वा. चे सुमारास, **अक्षय धाब्यासमोर वाकोडा शिवार हदगाव ते उमरखेड रोड चे बाजुस हदगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी घातक शस्त्रसह जबरी चोरी करण्याचे उद्देशाने कदम नगर परिसरात फिरत असल्याची माहिती मिळाल्याने त्यांचा शोध घेतला असता नमुद ठिकाणी एक खंजर, फायटर पंच, एक स्कु ड्रायव्हर, पांढरे रंगाची कार क्रं. एम.एच./14-जीयु. -0384 सह जबरी चोरी करण्याचा प्रयत्नात असताना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री संजय तुकाराम गायकवाड, वय 52 वर्षे, ने. पोस्टे हदगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 230/2022 कलम 398 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/श्री भोसले, मो.क्रं. 9552591244** हे करीत आहेत.

## 3)मो. सा. चोरी :-

**लोहा :-** दिनांक 28.06.2022 रोजी 14.00 वा. ते 15.00 वा. चे दरम्यान, **लोहा आठवडी बाजार ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची होंडा शाईन कंपनीची मो.सा. क्रं. एमएच-26/एवाय-3378 किंमती 40,000/- रुपयाची ही नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी प्रेमदास लक्ष्मण राठोड, वय 40 वर्षे, व्यवसाय शेती रा. नंदु तांडा, ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरन 150/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1754 सुर्यवंशी, मो.क्रं. 7057524134** हे करीत आहेत.

## 4)विवाहीतेचा छळ :-

**कंधार :-** दिनांक 11.06.2020 चे सहा महिन्यानंतर, **गोविंद नाईक तांडा रुई ता. कंधार जि. नांदेड ह.मु. दुर्गा तांडा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस माहेरुहुन ट्रॅक्टर घेण्यासाठी दोन लाख रुपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करुन शारिरीक व माणसीक छळ केला व जिव मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरनं 249/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2398 चव्हाण, मो.क्रं. 9420841070** हे करीत आहेत.

## 5)जुगार :-

**लोहा :-** दिनांक 30.07.2022 रोजी 17.05 वा. चे सुमारास, **शिवाजी चौक लोहा शिवनेरी बारच्या बाजूला लोहा ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना 3090/-रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/1349 ब्रम्हानंद दामोदर लामतुरे, ने. उप विभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कंधार** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 151/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/1754 सुर्यवंशी, मो.क्र. 7057524134** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :—

**1)सोनखेड :—** दिनांक 30.07.2022 रोजी 13.30 वा. चे सुमारास, **वडेपुरी वडगल्ली जाणारे रोडवर, ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा एकुण किंमती 1500/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोना/5699 वामन माधवराव नागरगोजे, ने. पोस्टे सोनखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 116/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1927 भुत्ते, मो.क्र. 9421292819** हे करीत आहेत.

**2)बारड :—** दिनांक 30.07.2022 रोजी 12.45 वा. चे सुमारास, **पिंपळगाव पाटी ते देगाव कडे जाणाऱ्या सार्वजनिक रोडचे कडेला मौजे देगाव ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु भिंगरी संत्रा एकुण किंमती 2880/—रुपयाचा माल होंन्डा ॲक्टीव्हा क्रं. एम.एच./26—सी.बी.—8701 किंमती 60,000/—रुपयाची असा एकुण किंमती 62,880/—रुपयाचे मालासह चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/729 अझरोद्दीन वलीयोद्दीन मोहम्मद, ने. पोस्टे बारड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं 56/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2375 पावडे, मो.क्र. 9823062375** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड